**ठळक बातम्या**

- कृषी उत्पादनांचा शेतकऱ्यांना मिळणारा भाव आणि बाजारातल्या किरकोळ विक्री किंमतीतली तफावत कमी करण्यासाठी सरकार समिती स्थापन करणार असल्याची शिवराज सिंग चौहान यांची माहिती

- राज्यात परतीच्या पावसामुळे अनेक जिल्ह्यात पिकांचं नुकसान

- मुंबई आंतरराष्ट्रीय विमातळावर प्रवाशाकडून आठ कोटी रुपये किंमतीचा गांजा जप्त

**आणि**

- कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या सामन्यात न्यूझीलंडचा भारतावर आठ गडी राखून विजय, मालिकेत १-० अशी घेतली आघाडी

**<><><><><>**

कृषी उत्पादनं आणि बागायती उत्पादनांचा शेतकऱ्यांना मिळणारा भाव आणि या उत्पादनांची बाजारातली किरकोळ विक्री किंमत यातली तफावत कमी करण्यासाठी सरकार एक समिती स्थापन करणार आहे, अशी माहिती केंद्रीय कृषीमंत्री शिवराज चौहान यांनी दिली. ते आज नवी दिल्लीत एका कृषी परिषदेत बोलत होते. शेतकरी आपला भाजीपाला ५ रुपये किलो भावानं विकतात आणि किरकोळ बाजारात मात्र तो ५० रुपये किलो भावानं विकला जातो, ही तफावत कमी करून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त लाभ मिळवून देण्याचं काम ही समिती करणार असल्याचं त्यांनी सांगितलं. कृषी संशोधनाचे फायदे प्रयोगशाळेपासून शेतापर्यंत पोहचवण्यासाठी पुढच्या महिन्यापासून ‘कृषी चौपाल’ उपक्रमाचा प्रारंभ केला जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद मोदी आज वाराणसी मतदारसंघाच्या दौऱ्यावर असून, सहा हजार १०० कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पांचं लोकार्पण आणि उद्घाटन त्यांच्या हस्ते हो◌ेत आहे. प्रधानमंत्र्यांनी आज दुपारी आर. जे. शंकर नेत्र रुग्णालयाचं उद्घाटन केलं. त्यानंतर ते दुपारी साडेचार वाजता वाराणसीतील सिगरा स्टेडियम इथं विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन करणार आहेत. वाराणसीच्या लालबहाद्दूर शास्त्री आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या नवीन टर्मिनल इमारतीची आणि विस्तारीत धावपट्टीची पायाभरणी प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होणार आहे.

आग्रा, दरभंगा आणि बागडोगरा विमानतळांच्या नवीन नागरी केंद्रांची पायाभरणी प्रधानमंत्री दूरस्थ पद्धतीनं करणार आहेत. मध्य प्रदेशातलं रेवा विमानतळ, अंबिकापूरचे माँ महामाया विमानतळ आणि सारस्वा विमानतळ यांच्या नवीन टर्मिनल इमारतींचं उद्घाटनही प्रधानमंत्र्यांच्या हस्ते दूरस्थ पद्धतीनं होणार आहे. खेलो इंडिया योजना आणि स्मार्ट सिटी मिशन अंतर्गत २१० कोटी रुपये खर्चून पुनर्विकास केलेल्या वाराणसी क्रीडासंकुलाचं उद्घाटनही प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होणार आहे.

**<><><><><>**

दिवाळी आणि छटपूजा या सणांसाठी उत्तर आणि पूर्वेकडच्या राज्यांकडे जाणाऱ्या प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेनं ५७० विशेष फेऱ्या जाहीर केल्या आहेत. महाराष्ट्रातील मुंबई, पुणे आणि नागपूरसह विविध ठिकाणांहून या फेऱ्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. १३२ फेऱ्या मुंबईहून, तर १४६ फेऱ्या पुण्याहून निघणार आहेत. तर १०८ फेऱ्या लातूर, सावंतवाडी, नागपूर, पुणे, कोल्हापूर, नांदेड आणि इतर ठिकाणी पोचणार आहेत. या रेल्वेंमध्ये वातानुकूलित, शयनयान आणि सर्वसाधारण डब्यांचा समावेश आहे. दक्षिणेकडच्या करीमनगर, कोचुवेली, काझिपेट आणि बेंगळुरूसाठी ८४ फेऱ्यांची व्यवस्था करण्यात आली

आहे. अधिक माहिती आणि सविस्तर वेळापत्रक प्रवासी www.enquiry.indianrail.gov.in या संकेतस्थळावरून किंवा NTES ॲपच्या माध्यमातून जाणून घेऊ शकतील.

**<><><><><>**

राज्यात परतीच्या पावसानं जोर धरला असून अनेक जिल्ह्यात पिकांचं नुकसान झालं आहे. अमरावती जिल्ह्यात कालपासून झालेल्या पावसामुळे शेतात असलेल्या सोयाबिनला त्याचा फटका बसला आहे. काही शेतकऱ्यांनी सोयाबीन घरी आणलं असलं तरी शेतात पडून असलेलं सोयाबीन खराब होण्याची भीती आहे. काही ठिकाणी तुरीला आलेल्या फुलोऱ्याला मोठ्या प्रमाणात फटका बसण्याची शक्यता आहे. भंडारा जिल्ह्यात काल झालेल्या मुसळधार पावसामुळे शेतात पाणी साचलं असून कापून ठेवलेल्या धान पिकाचं नुकसान झालं. नांदेड जिल्ह्यात सुद्धा अतिवृष्टीची नोंद झाली. आज सकाळी अप्पर मानार धारणाचे ५ तर विष्णुपुरी प्रकल्पाचा १ दरवाजा उघडला आहे. यंदा १०६ पूर्णांक ९३ टक्के पावसाची नोंद झाली असून पावसानं सरसरी ओलांडल्याचं वृत्त आहे.

**<><><><><>**

बीड जिल्ह्यातल्या गेवराई विधानसभा मतदारसंघात वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवार प्रियंका खेडकर यांनी आज चकलांबा गावातून प्रचाराला सुरुवात केली. महायुती आणि महाविकास आघाडीकडून उमेदवार जाहीर होण्यापूर्वीच वंचित बहुजन आघाडीनं गेवराईत आपला उमेदवार जाहीर केला आहे.

गेवराई विधानसभा मतदारसंघात पंडित आणि पवार या दोन राजकीय कुटुंबात सत्ता राहिली आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधल्या फुटीनंतर विधानसभा निवडणुकीचं समीकरण बदललं आहे. अजित पवार गटाकडून

विजयसिंह पंडित, तर महाविकास आघाडीकडून लक्ष्मण पवार यांना उमेदवारी मिळण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज नाशिक जिल्ह्यातल्या ८ मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

मुंबईतल्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर काल बँकॉकहुन आलेल्या एक प्रवाशाकडून सुमारे ८ किलोहून अधिक गांजा जप्त करण्यात आला असून या गांजाची किंमत अंदाजे ८ कोटी रुपये इतकी आहे. या प्रवाश्याने हा गांजा खेळणी आणि अन्नपदार्थांच्या डब्ब्यात लपवला होता. या व्यक्तीला अंमली पदार्थ नियंत्रण कायद्याखाली अटक करण्यात आली असून या प्रकरणाचा पुढील तपास सुरु आहे.

**<><><><><>**

कसोटी क्रिकेटच्या पहिल्या सामन्यात न्यूझीलंडनं भारताचा आठ गडी राखून पराभव करत मालिकेत १-० नं आघाडी घेतली आहे. भारताने दुसरा डाव काल ४६२ धावांवर आटोपल्यानंतर न्यूझीलंडसमोर १०७ धावांचं लक्ष्य ठेवलं होतं. २ गड्यांच्या मोबदल्यात न्यूझीलंडनं हे लक्ष्य पूर्ण केलं आणि भारतावर विजय मिळवला.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीत ज्या मतदारसंघात निवडून येण्याची शक्यता आहे, तिथं उमेदवार उभे करावेत, तसंच इतर ठिकाणी मराठा आरक्षणाला समर्थन देणाऱ्याला मतदान करावं, असं आवाहन मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांनी केलं. जालना जिल्ह्यातल्या आंतरवली सराटी इथं सभेत ते आज बोलत होते. कोणत्या मतदारसंघात मराठा समाजाची ताकद आहे, हे तपासणं गरजेचं आहे असं जरांगे यावेळी म्हणाले.

<><><><>

भाजपाचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी आज पक्षाला सोडचिठ्ठी देण्याचा निर्णय जाहीर केला. दुसऱ्या कोणत्या पक्षात जाणार हे त्यांनी स्पष्ट केलं नसून याबाबत लवकरच निर्णय घेऊ, असं सांगितलं आहे.

<><><><>

राज्यात आचारसंहिता लागू झाल्यापासून सी व्हिजिल या ॲपवर आतापर्यंत ५७६ तक्रारी आल्या असून त्यातल्या ५६३ तक्रारी निकाली काढण्यात आल्याची माहिती अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी डॉक्टर किरण कुलकर्णी यांनी दिली. आचारसंहिता लागू झाल्यानंतर  शासकीय, सार्वजनिक, खासगी जागेतल्या विनापरवानगी लावलेल्या जवळपास सात लाख जाहिराती काढल्या,  तसंच बेकायदेशीर पैसे, दारू, अंमली पदार्थ इत्यादी मिळून १४ कोटी ९० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याचं कुलकर्णी यांनी सांगितलं.

<><><><>

धाराशिव जिल्ह्यातल्या तुळजापूरचे माजी आमदार नरेंद्र बोरगावकर यांचं आज पहाटे पुण्यात एका खाजगी रुग्णालयात निधन झालं. ते ८७ वर्षांचे  होते. बोरगावकर यांनी लातूर, बीड, धाराशिव या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाचं काही काळ प्रतिनिधित्व केलं होतं. तत्कालीन उस्मानाबाद जिल्हा परिषदेचे अध्यक्ष

म्हणूनही त्यांनी काम केलं होतं. त्यांच्या पार्थिव देहावर आज तुळजापूर इथं अंत्यसंस्कार केले जाणार आहेत.

**<><><><><>**

रायगड जिल्ह्यातल्या हरिहरेश्वर इथं वादात एका महिलेच्या अंगावर गाडी घातल्याने तिचा मृत्यू झाला आहे. हॉटेलच्या रुम भाड्यावरून झालेल्या वादामुळे कारचालकाने महिलेच्या अंगावर कार चढवल्याचं पोलिसांनी सांगितलं. कारमधल्या तिघा जणांना ताब्यात घेतल्याची माहिती पोलिसांनी दिली.

**<><><><><>**

तेलंगणा लोकसेवा आयोगाच्या गट १ सेवेच्या उमेदवारांचं समर्थन करत सुरु असलेल्या विरोध प्रदर्शनात सहभागी झाल्याबद्दल तेलंगणा पोलिसांनी केंद्रीय गृह राज्यमंत्री बंडी संजय कुमार यांना अटक केली. हे उमेदवार भरती प्रक्रिया आणि आरक्षणासंदर्भात सरकारच्या काही आदेशांच्या अंमलबजावणीला विरोध दर्शवत मुख्य परीक्षा स्थगित करण्याची मागणी करत आहेत. संजय कुमार यांनी काल विरोध प्रदर्शन करणाऱ्या परीक्षार्थींची भेट घेतली होती. त्यानंतर मुख्यमंत्री रेवन्त रेड्डी यांना भेटून उमेदवारांची बाजू मांडण्यासाठी कुमार यांनी चलो सचिवालय रॅली काढली. मात्र पोलिसांनी त्यांना सचिवालयात जाण्यापासून रोखलं आणि त्यांना ताब्यात घेऊन नामपल्लीमधल्या भाजपाच्या कार्यालयात सोडलं.

**//<><><><><>//**